# प्रकरण दुसरे
# संशोधन समस्या आणि पद्धतीशास्त्र
## (THE RESEARCH PROBLEM AND METHODOLOGY)

**प्रस्तावना :**

प्रस्तुत प्रकरणामध्ये उपलब्धसाहित्याच्या परिशिलनावरून आधीच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षाचा आढावा घेतला आहे तसेच प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीविषयीचे विवेचन केले आहे. प्रकरणाची विभागणी दोन विभागात केली आहे. पहिल्या विभागात उपलब्ध साहित्याच्या परिशिलनावरून आधीच्या संशोधनाच्या प्रमुख निष्कर्षाचा आढावा घेतला आहे. तसेच दुसऱ्या विभागामध्ये प्रस्तुत अभ्यासासाठी अवलंबिण्यात आलेल्या संशोधन पद्धतीविषयीचे विवेचन करण्यात आले आहे.

### विभाग – पहिला

**संशोधन साहित्याचे परिशिलन (The Review of Relevant of Literature)**

ग्रामीण दारिद्र्य निर्मुलन कार्यक्रमाचा प्रभाव : करवीर तालुक्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अभ्यास हा प्रस्तुत लघुशोधनिबिंधाचा विषय आहे. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजना ही सापेक्षत: अलीकडील योजना आहे. त्यामुळे स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेविषयीचे मूल्यमापनात्मक अभ्यास फारच कमी प्रमाणात झाले असल्याचे प्रस्तुत संशोधिकेस आढळून आले. स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेविषयी किंवा महिला

स्वयंसहाय्यता गटासंबंधी जे अभ्यास यापूर्वी झाले आहेत ते प्रस्तुत अभ्यासासाठी समर्पक ठरणारे अभ्यास मानून त्यापैकी संशोधिकेस उपलब्ध झालेल्या अभ्यासांचा आढावा घेण्याचा प्रयत्न या विभागात करण्यात आला आहे.

**१) पी. व्ही. नरासहाय, सुदर्शन मूर्ती आणि पी सुरेश यांनी (२००६)**

"Development of Women Entrepreneurship Through Swarn Jayanti Gram Swarozgar Yojana (SGSY) - A Review" या शोधनिंबधात SGSY योजनेच्या माध्यमातून महिला उद्योजकतेचा विकास कसा झाला याचा आढावा घेतला आहे. संशोधकांनी हा अभ्यास करण्यासाठी काडाप्पा जिल्ह्या संबंधीची, स्वयंसहाय्यता बचत गटाबाबतची २००१-०५ या कालावधीसाठी दुय्यम माहिती DRDA मधून गोळा केली आहे. संशोधकानी काडाप्पा जिल्ह्यातील SGSY योजनेची प्रगती ही स्थापन झालेल्या बचत गटांची संख्या, सभासदांची संख्या, अनुदानावर झालेला खर्च व उपलब्ध करून दिलेल्या सोयी सुविधा या निकषांवर मोजली आहे. पण त्यात कुठेही कोणत्या उद्योगामुळे लाभार्थीचे उत्पन्न कसे व किती वाढले या बाबींचा विचार केलेला नाही. SGSY योजनेची व्यवस्थित प्रगती साधावयाची असेल तर महिलांना आर्थिक दृष्ट्या किफायतशीर व त्यांचे उत्पन्न जास्तीत जास्त वाढेल असे उद्योग दिले पाहिजेत., स्वरोजगारासाठी आवश्यक सल्ला व मार्गदर्शन देणे आणि महिलांना त्यांच्या रोजगारात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी मदत करणे इ. बाबी करण्याची आवश्यकता आहे असे संशोधकांनी सुचविले आहे.

**२) पी. आर. शिवशंकर, रामू मधुसूदन राव आणि के. एकंबरा (२००६)**

यांनी व्यष्टी अध्ययन पद्धतीचा अवलंब करून, आंध्र प्रदेश मधील चित्तूर जिल्ह्यातील

SGSY योजनेचा अभ्यास केला आहे. सिंपल रँडम सँपलिंग विदाऊट रिप्लेसमेंट तंत्राचा अवलंब करून १४७ युनिटस्ची अभ्यासासाठी नमुना म्हणून निवड करण्यात आली होती. ३६ व्यक्तीगत लाभार्थ्यांचाही अभ्यासात समावेश होता. सामाजिक दर्जा, गुंतवणूक, मिळकत आणि स्वरोजगाराची उपलब्धता या संदर्भात चित्तूर जिल्ह्यातील SGSY चे मूल्यमापन करणे हे अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट होते. या अभ्यासावरून दिसून आलेले ठळक निष्कर्ष आणि संशोधकांनी केलेल्या ठळक सूचना खालीलप्रमाणे -

१) अनेक लाभार्थी DRDA कडून मिळणाऱ्या सेवेबाबत, बँकेकडून, मिळणाऱ्या सेवेबाबत व कामकाजाच्या पद्धतीबाबत नाराज होते. फाईल्स एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठविणे आणि निवड प्रक्रिया या दोहोत सुधारणा होणे आवश्यक आहे.

२) लाभार्थ्यांना मिळणाऱ्या प्रशिक्षणाच्या आशयात बदल होणे अपेक्षित आहे.

३) बहुतांशी लाभार्थ्यांना कर्जपुरवठा होण्यास वेळ लागला.

४) लाभार्थ्यांनी उद्योग निवडताना पूर्वानुभव आणि त्यातून होणारी मिळकत या दोन निकषांचा विचार करावा.

५) ३० बँका SGSY साठी कर्ज देण्यास उपलब्ध आहेत. त्यातील काहीच बँका प्रत्यक्षात कर्ज मंजूर करतात. यासाठी सर्व राष्ट्रीयीकृत बँका आणि कमर्शियल बँकांनी SGSY च्या अंमलबजावणीत सहभागी होणे आवश्यक आहे.

६) कर्ज मंजूरी व कर्ज वाटप याबाबत भरपूर तफावत आहे. त्यासाठी बँक कर्मचारी वर्गाने त्यामधील तफावत दूर करावी.

७) कर्ज मंजूरीसाठी बँकेत घालाव्या लागणाऱ्या फेऱ्यांमुळे प्रकल्पाच्या मूळ किंमतीमध्ये वाढ होते. त्यासाठी बँकांनी आपल्या कामकाजामध्ये सुधारणा करावी.

८) SGSY योजनेमुळे बऱ्याच प्रमाणात स्वरोजगारी निर्माण झाल्यामुळे ही योजना ताकतवार करणे गरजेचे आहे.

९) कर्ज फेडण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी बँकांनी आपली SGSY योजनेमधील कर्जवसुली व्यवस्थित करण्याची गरज आहे.

१०) उद्योग न चालू करताच कर्ज घेऊन पैशाचा इतर कारणासाठी उपयोग होतो असेही काही प्रकरणांच्या बाबत आढळून आले.

"Outlays Versus Out comes : A Study of the Implementation of Swarn Jayanti Gramswarozgar Yojana In Orissa" या शिर्षकाच्या शोधनिबंधात **Gupta A. P. (2005)** यांनी ओरिसामधील SGSY योजनेच्या अंमलबजावणीचा अभ्यास केला आहे. त्यामध्ये ही योजना तिची उद्दिष्ट्ये प्राप्त करण्यात योग्य त्या प्रमाणात कशी यशस्वी झाली नाही त्याचप्रमाणे ही योजना पुढील काळासाठी यशस्वी होण्यासाठी कोणते उपाय योजले पाहिजेत या विषयी विश्लेषण केले आहे.

प्रस्तुत संशोधन लेखात संशोधकाने असे निदर्शनास आणले आहे की, १ एप्रिल १९९९ ते ३१ मार्च २००२ या कालावधीत SGSY या योजनेवर एकूण २३३.७८ कोटी रुपये खर्च झाल्याचे ओरिसा राज्य सरकारने म्हटले आहे. त्यापैकी ९७.१० कोटी रुपये रकमेच्या खर्चाचा हिशोब तपासला गेला आहे. त्यापैकी ६२.१७ टक्के खर्च अनियमित

खर्च असल्याचे दिसून आले आहे. या वित्तीय अवलोकानात असेही आढळून आले आहे की हिशोब तपासलेल्या रकमेपैकी ३७.८३% योजनेवर झालेला खर्च होता. या अवलोकनात पूर्वी दारिद्रय रेषेखाली असणारी किती कुटुंबे दारिद्रय रेषेच्या वर आणण्यात SGSY योजनेला यश आले याचा कुठेही उल्लेख नाही. १९९९ ते २००२ या कालावधीत २२०३७ इतकी कुटुंबे SGSY योजनेखाली आणण्यात आली, एवढाच उल्लेख केला गेला आहे. संशोधकाने असे म्हटले आहे की, SGSY योजनेसाठी उपलब्ध होणारी सरकारी रक्कम आणि या योजनेचे उद्दिष्ट गाठण्यातील यश या दोहोत संबंध असला पाहिजे. म्हणजे योजनेत होणाऱ्या प्रगतीच्या प्रमाणात योजनेला केंद्र आणि राज्य शासनाने निधी पुरविला पाहिजे.

या अभ्यासातून SGSY च्या अंमलबजावणीतील काही अन्य त्रुटीही आढळून आल्या आहेत. त्यापैकी महत्त्वाच्या त्रुटी पुढीलप्रमाणे -

१) लाभार्थीसाठी आर्थिक क्रियांची निवड करताना तीन जिल्ह्यामध्ये सरपंच व खेड्यातील गरीबांना सामील करून घेतले नव्हते. चार जिल्ह्यांमधील १८ प्रकल्प अहवालांमध्ये प्रशिक्षण, पतपुरवठा, तंत्रशिक्षण व मार्केटिंग या बाबींची चर्चाही नव्हती.

२) सात तालुक्यांमधील एकूण मंजूर झालेल्या ५१.४५ लाखापैकी ३६.०२ लाख इतकेच कर्ज २३१ लाभार्थींना दिलेले होते. उर्वरित कर्ज का दिले गेले नाही याची नोंद कुठेही मिळत नाही. त्याचबरोबर २०००-२००१ मध्ये सात ब्लॉकमधील कर्ज वाटपासाठी दोन ते सात महिने इतक्या कालावधीचा विलंब लागला होता.

३) बोलनगिर, वळसुरे, ढेणेकलाल, गंजम, जयपूर, कालहंडी, खुर्दा, मयुरभंज या जिल्ह्यातील १९९९ ते २००२ मधील एकूण ५.७५ कोटी पैकी फक्त ९४ लाख प्रशिक्षणासाठी वापरले गेले.

४) बेगुनिया, भ्वानी पटना, चत्रपुर, गोलागुंडा, हीडोल, झाशीपूर, जयपटना, जुनागड, कपतीपाडा, कशींग खैरा खुद्रा, निलगिरी, ओडापाडा, रेमुनाया, पंधरा ब्लाकमध्ये १.७७ कोटीचे व ९६१ लाभार्थींची मालमत्ता आहे. त्याचप्रमाणे २१ लाखाच्या १३३ मालमत्ता चत्रपूर ब्लॉकमधील खराब अथवा पडून आहेत.

५) १४० तपासलेल्या एकूण अहवालामधील कुठल्याही लाभार्थ्याला अपेक्षित उत्पन्न २००० सुद्धा मिळालेले नव्हते. ३ ब्लॉकमधील (इंडोल, खैरा, बैगुनिया) लाभार्थींचे महेन्याचे उत्पन्न रूपये २०० ते १८०० इतकेच दिसून आले.

या सर्वावरून असे दिसून येते की, ३७.८३ टक्के हा SGSY योजनेवर झालेला खर्चही अपेक्षित उद्दिष्ट साध्य करण्यात यशस्वी झालेला नाही.

त्यासाठी ओरिसातील SGSY योजनेची नव्याने पुर्नबाधणी करण्याची गरज आहे. त्याचप्रमाणे सरकारने केलेले खर्च त्यांचे पुनर्विलोकन करणे व ही योजना सशक्त करण्यासाठी तिचा पुन्हा अभ्यास करण्याची गरज आहे, असे संशोधकाने म्हटले आहे.

४) **वाय गंगी रेड्डी** यांनी राजस्थानमधील सवाई माधोपूरमध्ये राबविलेल्या स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अभ्यास केला आहे. रेड्डी यांनी सवाई माधोपूरमधील SGSY योजनेची भौतीक प्रगती, आर्थिक प्रगती, स्वयंरोजगारीना देण्यात येणारे प्रशिक्षण, लाभार्थ्यांमधील कमकुवत गटातील सदस्यांचे प्रमाण, स्वयंसहाय्यता बचत गटाची स्थापना

आणि योजनेअंतर्गत समाविष्ट केलेले महत्त्वपूर्ण आर्थिक उद्योग/व्यवसाय या बाबीवर विशेष भर दिला आहे.

भौतीक प्रगर्तबाबत संशोधकाला दिसून आले की, जिल्ह्यातील ५ तालुक्यातील बहुतांशी लाभार्थी हे व्यक्तीगत लाभार्थी असून १६१४ अर्जदारांपैकी ५०८ अर्जदारांना बँकांनी कर्जे मंजूर केली होती. सवाई माधोपूर जिल्ह्यासाठी १९९९-२००० सालात एकूण ३०० लाख रूपये उपलब्ध होते. पैकी २१७.२७ कोटी रुपये कार्यक्रम अंमलबजावणीसाठी (पतपुरवठा आणि अनुदान) खर्च झाले. पायाभूत सुविधा आणि लाभार्थ्यांच्या प्रशिक्षणावर १०% खर्च राखून ठेवला होता. पैकी सुमारे ७१ कोटी रूपये खर्च झाला होता. एकूण खर्च ३०९.०७ कोटी इतका झाला होता. लाभार्थ्यांमध्ये अनुसूचीत जातीचे १५०, अनुसूचीत जमातीचे १४० तर २९२ स्त्रिया आणि एका अपंगाचा समावेश होता की ज्यांना प्रशिक्षण मिळाले होते. प्रशिक्षणाचा कालावधी कमी (२ दिवस) असल्याचे मत संशोधकांनी नोंदवले आहे. गट स्थापन करून सामूहिक प्रकल्पांसाठी लोक पुढाकार घेत नाहीत, असे प्रस्तुत संशोधनात आढळून आले आहे.

लघुपाटबंधारे योजना, डेअरी उद्योग, मूर्तीकला, हॉर्टिकल्चर, मच्छिपालन, तेल आणि वस्त्रोद्योग, मसाला उद्योग हे सर्व सवई माधोपूर मध्ये Key activites म्हणून राबविण्यात आलेले उद्योग आहेत. या योजनेमार्फत लाभार्थ्यांना मिळालेले आयडेंटीकार्ड सर्व लोकांना मिळालेले नाही असे संशोधकाच्या लक्षात आले आहे.

अभ्यासावरून असे लक्षात आले आहे की लाभार्थ्यांची ओळख पटवण्यासाठी ग्रामपंचायतीवर ग्राम्सभेचे वर्चस्व मान्य होत नाही ग्रामसभेतील लोकांचा सहभाग हवा

तेवढा नाही. त्याचबरोबर सामूहिक गट बनविणे ही सरकारी यंत्रणेसमोर सर्वात मोठी अडचण आहे. बँकाचा दृष्टीकोन सकारात्मक आहे असेही या अभ्यासात आढळून आले आहे.

५) प्रा. एम. यू. मुलानी यांनी 'भारतातील स्वयंसहाय्यता समूहांची पार्श्वभूमी व वाटचाल' या निबंधात सूक्ष्मवित्त म्हणजे काय, भारतातील बचतगटांची वाढ व त्यांची वाटचाल यांची चर्चा केली आहे.

संघटीत बँकींग व्यवसायाच्या परिघाबाहेरचा समाज, उद्योग, सेवा इ. घटकांना वित्तीय सेवांचे छत्र पुरविणारी एकात्म यंत्रणा म्हणजे सूक्ष्मवित्त होय. सुक्ष्मवित्तचे एक प्रतिमान म्हणून बचत गट स्वयंसहाय्यता समूह नावाची एक संकल्पना साकारत आहे. बचत गटाचे लॉजिक याच पठडीतील आहे. समाजातील १० ते २० सदस्यांनी एकत्र येऊन, समूहानी बचत करून, बचतीचा कोष पुरेश समृद्ध झाला की त्यातून प्रत्येक सदस्याला गरजेनुसार परिभ्रमणाने विनातारण कर्ज द्यावयाचे. त्या कर्जाचे संपूर्ण दायित्व गटावर असेल.

सन १९७५ च्या दरम्यान बांगला देशातील चित्तगाव व विद्यापीठातील अर्थशास्त्राचे प्रपाठक व जगप्रसिद्ध ग्रामीण बँकेचे प्रणेते डॉ. प्रा. महंमद युनूस यांनी मुहूर्तमेढ रोवली. त्यानंतर लॅटीन अमेरिका, आफ्रिका, इंडोनेशिया, मलेशिया, फिलीपाईन्स, आखाती देश, आशियायी देशात चळवळ कार्यरत झाली आहे.

भारतामध्ये रिझर्व्ह अधिकोषनाच्या सहाय्याने व नाबार्डच्या पुढाकाराने म्हैसूर रिसेटलमेंट अॅण्ड डेव्हलपमेंट एजन्सी या स्वयंसेवी संस्थेने स्वयंसहाय्यता गटाचा श्रीगणेशा

केला. त्यानंतर महारष्ट्र, आंध्रपेदश, तामीळनाडू, केरळ, राजस्थान, अरुणाचलम् येथे बचत गट सुरू झाले. २००२-०३ मध्ये भारतात ६,८२,५७५ इतके बचत गट होते. २००४-०५ मध्ये या बचत गटाची एकूण संख्या १०,६८,६९७ इतकी झाली. महाराष्ट्र राज्यात मार्च २००५ अखेर स्वयंसहाय्यता गटाची बँक जोडणी ७,११,८६ इतकी असून त्यांना रूपये २२३८११ दशलक्ष इतका पतपुरवठा झाला आहे.

स्वयंसहाय्यता गटांना बळकटी मिळावी म्हणून शासकीय पातळीवर धोरणात्मक निर्णय घेऊन अंमलबजावणी केली जात आहे.

१) बचत गटांना बँकाकडून ७ टक्के व्याजदराने कर्जपुरवठा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

२) बँकाकडून कर्ज देताना स्टँपड्यूटी रद्द करण्यात आली आहे.

३) अंगणवाडी केंद्रांना खिचडी वाटप व खिडची शिजविण्याचे कार्य स्वयंसहाय्यता गटांना देण्यात येत आहे.

४) स्वस्त धान्य दुकाने स्वयंसहाय्यता गटांना चालविण्यास दिली आहेत.

५) स्वयंसहाय्यता गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंना विक्री, जागा, तहसिलदार कार्यालय, पंचायत समिती आवारे, ग्रामपंचायतीची आवारे, प्राथमिक आरोग्य केंद्राचे परिसर, द्रुतगती मार्गावर थांब्याच्या परिसरात जागा, नगरपालिका, महानगरपालिका हद्दीत गाळे, शाळा महाविद्यालये या परिसरात जागा देण्याचे निर्णय घेतलेले आहेत.

६) शाळा, महाविद्यालयात कॅन्टीन, खानावळ चालविण्यासाठी जागा दिली जात आहे.

७) फळबाग विकास आणि वनौषधी विक्रीचा परवाना देण्यात आला आहे.

८) राष्ट्रीय सहकार विकास निगमाच्या आर्थिक सहाय्याने निर्मिती झालेल्या सहकारी कुक्कुटपालन संस्थांचे मार्केटिंग व विक्री करण्याचे काम देण्यात आले आहे.

९) निर्मलग्राम योजनांतर्गत गटांना शौचालय बांधण्यासाठी बिनव्याजी कर्ज देण्यात येत आहे.

१०) बँक ऑफ महाराष्ट्राच्या वतीने सावित्री क्रेडीट कार्ड देण्यात येत आहे.

११) गावोगावात गटामार्फत वाचनालये सुरू करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

१२) महिला स्वयंसहाय्यता गटांना विमा संरक्षण देण्यात येत आहे.

१३) नगरपालिका व महानगरपालिका कचरा गोळा करण्याचे काम या गटांना देण्यात येत आहे.

१४) शासनामार्फत स्वयंसहाय्यता गटांना विविध व्यवसायाचे मोफत प्रशिक्षण देण्यात येत आहे.

अशाप्रकारे शासकीय, निमशासकीय पातळीवर निर्णय घेऊन स्वयंसहाय्यता गटाच्या चळवळीत पोषक वातावरण निर्माण केले आहे.

६) **प्रा. डॉ. बोखोले** यांनी उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचत गटांचा अभ्यास केला आहे. हा अभ्यास महिला बचत गटाच्या वाटचाली संदर्भात केला आहे.

उस्मानाबाद जिल्ह्यात सन १९९९ ते २००० पर्यंत फक्त २६५ गट होते. पण सन २००६ पर्यंत हीच संख्या १०,६२८ झाली. याचाच अर्थ या काळात बचत गटाच्या संख्येत जवळ जवळ ४० पटीने वाढ झाल्याचे दिसून येते. याचे कारण उस्मानाबाद जिल्ह्यातील बँकांनी भरघोस कर्जपुरवठा केल्यामुळे गटांच्या संख्येत वाढ झाली. २००४-०५ ते २००५-०६ या दोन वर्षात बचतगटांची संख्या दुपटीने वाढली तर बँकांनी केलेल्या कर्जपुरवठ्याचे प्रमाण पावणेतीन पटीने वाढ झाल्याचे दिसून येते.

उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचतगटांना विशेषत: भाजीपाला विक्री, किराणादुकान, पापड तयार करणे, शेवया तयार करणे, खड्डू तयार करणे, अगरबत्ती निर्मिती, मेणबत्ती निर्मिती, इस्त्रीचे दुकान, स्टेशनरी दुकान, खेळणी तयार करणे, द्रोण-पत्रावळ्या, मिठाई दुकान, शालोपयोगी साहित्य, खाद्यपदार्थ, फाईल्स इ. अनेक छोट्या उद्योगासाठी कर्जपुरवठा करण्यात आला.

अभ्यासकाने महिला बचत गटांसमोरील काही अडचणी निदर्शनास आणल्या आहेत त्या खालीलप्रमाणे -

१) तयार केलेल्या वस्तूंना चांगल्या प्रकारची बाजारपेठ उपलब्ध होत नाही.

२) बँका दोन टप्प्यात कर्जाचे वाटप करतात. SGSY व्यतिरिक्त इतर बी.पी. एल आणि नॉन बी.पी.एल. बचत गटांना कर्जे दिली जात नाहीत.

३) तसेच शासनाकडून नॉन बी.पी.एल. गटांना अनुदान मिळत नाही.

४) बचत गटांच्या स्थापनेबाबत राज्यस्तरीय कायदा नाही.

# विभाग - दुसरा

## संशोधन पद्धती (Research Methodology)

प्रस्तुत विभागामध्ये या अभ्यासासाठी वापरण्यात आलेल्या संशोधन पद्धतीचे विवेचन करण्यात अ‍ले आहे. संशोधन समस्या, संशोधनाची उद्दिष्ट्ये, संशोधन क्षेत्र, संशोधन आराखडा, नमुना निवड, तथ्य संकलनासाठी वापरलेले तंत्र, माहितीचे स्त्रोत, माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण आणि प्रकरण नियोजन या संशोधन आराखड्याच्या विविध पैलूंचे विवेचन करण्यात आले आहे.

### २.१ संशोधन समस्या (Statement of the Problem) :

स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अभ्यास करून या योजनेचा लाभार्थींच्यावर काय प्रभाव झाला आहे याचे परीक्षण करणे हे प्रस्तुत संशोधनाचे मुख्य उद्दिष्ट आहे. त्यानुसार अभ्यासाचे शिर्षक पुढीलप्रमाणे आहे.

**''ग्रामीण दारिद्रय निर्मूलन कार्यक्रमाचा प्रभाव : करवीर तालुक्यातील स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा अभ्यास''**

**"Impact of Rural Poverty Erdication Programmes : A Study of Swarnjayanti Gram Swa-Rozgar Yojana (SGSY) In Karveer Taluka"**

### २.२ अभ्यासाची विशिष्ट उद्दिष्ट्ये (Specific Objectives of the study) :

अभ्यासाची त्रिशिष्ट उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे ठरविण्यात आली.

१) स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेच्या महत्त्वाच्या वैशिष्ट्यांचा अभ्यास करणे.

२) करवीर तालुक्यातील अभ्यासासाठी निवडलेल्या खेडेगावामधील SGSY च्या अंमलबजावणीचा अभ्यास करणे.

३) SGSY चा लाभार्थ्यांच्यावर झालेल्या प्रभावाचा अभ्यास करणे.

## २.३ अभ्यास क्षेत्र (The Study Area) :

प्रस्तुत अभ्यासासाठी महाराष्ट्र राज्यातील कोल्हापूर जिल्ह्याच्या करवीर तालुक्यातील वसगडे, निगवे दुमाला व आंबेवाडी ही तीन गावे निवडण्यात आली आहेत. प्रस्तुत अभ्यास या तीन गावातील निवडक महिला बचत गटापुरता मर्यादित आहे.

## २.४ संशोधन आराखडा (Research Design) :

प्रस्तुत अभ्यासासाठी अन्वेषणात्मक संशोधन आराखड्याचा (Exploratory Research Design) अवलंब केला आहे.

## २.५ माहितीचे स्त्रोत (Sources of Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी पुढील दोन स्त्रोताचा अवलंब केला आहे.

१) प्राथमिक माहिती बचत गटातील SGSY योजनेचे लाभधारक स्वरोजगारी यांच्याकडून मिळविली आहे.

२) दुय्यम माहिती जिल्हा परिषद, तालुका पंचायत समिती इ. ऑफीसमधून, पुस्तके, जर्नल्स, प्रसिद्ध झालेले संशोधन अहवाल इ. मधून मिळविली आहे.

## २.६ नमुना निवड (Sampling) :

प्रस्तुत अभ्यासात नमुना निवड खालीलप्रमाणे करण्यात आली.

अ) गावाची निवड : संशोधकाजवळ असणारा वेळ व श्रम आणि माहिती मिळण्याची शक्यता या बाबी ध्यानात घेऊन वसगडे, निगवे दुमाला आणि आंबेवाडी या तीन गावांची हेतुपूर्वक (Purposively) निवड केली आहे.

**ब) स्वयंसहाय्यता बचत गट आणि स्वरोजगारी लाभार्थीची निवड :** प्रथम वसगडे, निगवे दुमाला आणि आंबेवाडी गावाला भेटी देऊन या तिन्ही गावातील SGSY योजनेअंतर्गत लाभ मिळविणाऱ्या बचत गटांची यादी तयार करण्यात आली. सदर यादीतून जे बचत गट किमान ४ वर्षे सलग कार्यरत आहेत अशा ५ गटांची निवड करण्याचे ठरविले. त्यानुसार हेतूनिष्ठ नमुना निवड पद्धतीने (Purposive Sampling Technique) वसगडे गावातील दोन, निगवे दुमाला गावातील एक व आंबेवाडी गावातील दोन अशा पाच बचतगटांची व त्यातील सर्व ५० लाभार्थींची प्रस्तुत अभ्यासासाठी निवड करण्यात आली.

## २.७ तथ्य संकलनाची तंत्रे (Tools for Collection of Data) :

प्रस्तुत अभ्यासासाठी माहिती मिळविण्यासाठी मुलाखत अनुसूची (Interview Schedule) या तथ्य संकलनाच्या तंत्राचा वापर केला आहे. अभ्यासाची उद्दिष्ट्ये नजरेसमोर ठेऊन एक मुलाखत अनुसूची तयार केली. सदर अनुसूचीची पूर्व चाचणी घेण्यात आली. आवश्यक तेथे प्रश्नांमध्ये दुरूस्त्या करण्यात आल्या. काही प्रश्न वगळले तर काही नवीन प्रश्न समाविष्ट करण्यात आले सुधारित मुलाखत अनुसूचीद्वारे बचतगटातील लाभार्थींची माहिती मिळविली. नमुन्यात समाविष्ट असणाऱ्या बचतगटातील व्यक्तींच्या

व्यक्तीगत मुलाखती घेतल्या आहेत. याशिवाय वैयक्तीक निरीक्षण तंत्र, ग्रामसेवकांच्या बरोबर व उद्योग्य विस्तार अधिकारी यांच्याबरोबर चर्चा करून माहिती मिळविली आहे.

## २.८ तथ्य संकलन :

तथ्य संकलनाचे काम दिनांक १० मार्च ते २० मार्च २००७ व १ एप्रील ते मे २००७ या कालावधीत करण्यात आले आहे.

## २.९ माहितीचे विश्लेषण आणि सादरीकरण (Analysis, Interpretation and Presentation of Data) :

मुलाखत अनुसूचीद्वारे संकलित केलेल्या माहितीचे सुयोग्य वर्गीकरण आणि विश्लेषण करण्यासाठी संगणकाचा वापर करून या माहितीवर प्रक्रिया करण्याचे निश्चित करण्यात आले. त्यानुसार एक संकेत पुस्तिका (Code Book) तयार करण्यात आली. संकेत पुस्तिकेच्या सहाय्याने मिळविलेल्या माहितीचे सांकेतीकरण केले. सदरची माहिती समाजशास्त्र विभागात UKC-SAP-Phase-I या प्रकल्पाअंतर्गत उपलब्ध झालेल्या संगणक प्रयोगशाळेतील संगणकात भरण्यात आली. SPSS सॉफ्टवेअरच्या सहाय्याने माहितीवर प्रक्रिया करण्यात आली.

संगणकाच्या सहाय्याने प्रक्रिया केलेल्या माहितीच्या आधारे सारण्या तयार करण्यात आल्या आहेत. त्यातील सांख्यिकी माहितीचे विश्लेषण करून अभ्यासाचे निष्कर्ष काढण्यात आले आहेत. अभ्यासविषय, अभ्यासाची उद्दिष्टे, मिळविलेली प्राथमिक व दुय्यम माहिती यांचे योग्य संघटन व सादरीकरण करण्यासाठी विविध प्रकरणांचे नियोजन करण्यात आले.

9

## २.१० अहवालातील प्रकरणांची रूपरेषा (Chapterization Scleme) :

सदर अहवालात माहितीचे सादरीकरण खालील प्रकरणात करण्यात आले आहे.

प्रकरण १ - स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचे स्वरूप

प्रकरण २ - संशोधन साहित्याचे परिशीलन आणि पद्धतीशास्त्र

प्रकरण ३ - कोल्हापूर जिल्ह्यातील आणि निवडक गावातील ग्राम स्वरोजगार योजनेची अंमलबजावणी आणि प्रगती : थोडक्यात आढावा

प्रकरण ४ - स्वर्णजयंती ग्राम स्वरोजगार योजनेचा प्रभाव

प्रकरण ५ - सारांश व निष्कर्ष

## संदर्भ सूची :

1. P.V. Narasaiah, Sudarsana Murthy, P. Suresh (2006): "Development of Women Entrepreneurship Through Swarnajayanthi Gram Swa-Rozgar Yojana (SGSY), A Review Scheme" Small Enterprises Management of Extension Journal (SEDME), Vol. 33, No. 02, p. 37 to 42.

2. P.R. Savasanl, M. Madhusudan Var. K. Erambara (2006), Evaluation of Swarnajayanthi Gram Swa-Rozgar Yojana (SGSY) A Case Study, Small Enterprises Management of Extension Journal (SEDME), Vol. 33, No. 02, pp. 29 to 36.

3. Anand P Gupta (2005): "Out lays versus outcome. A Study of the implementation of Swarjanyanti Gram Swa-Rozgar Yojana in Orissa". The Indian Journal of Public Administration, Vol. II, No. 3, July-Sept. 2005, pp. 562-565.

4. Y. Gangi Reddy, Swarjayanti Gram Swarojar Yojana (SGSY) in Rajasthan : A Few Observations, IASSI Quarterly Vol. No. 19, No. 01, 2000, pp. 38 to 53.

5. प्रा. राम यु. मुलानी (२००७): "भारतातील स्वयंसहाय्यक समूहांची पार्श्वभूमी व वाटचाल", योजना, खंड ३४, नंबर १, एप्रिल २००७, पान २८ ते ३२.

६. प्रा.डॉ. बारबोले (२००७): "उस्मानाबाद जिल्ह्यातील महिला बचत गट : एक दृष्टीकोन", योजना, खंड ३४, नं. १, एप्रिल २००७, पान ४१ ते ४६.